


**चला, आपण सर्वजण मिळून या परिस्थितीचा सामना करूयात**

अनिश्चितता आणि भीतीचे सावट हे आपल्या रोजच्या जगण्याचाच भाग होत आहे, आणि निश्चितच आम्ही सर्व महाराष्ट्र मंडळे यामध्ये तुमच्या साथीला आहोत.

कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आपण सर्वजण एकजुटीने प्रयत्न करीत असताना सर्वांनाच काही अभूतपूर्व आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे पालक, आजी-आजोबा, मुले, विद्यार्थी, प्रौढ, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांसमोर नवीन आव्हाने उभे ठाकली आहेत आणि याची आम्हाला पूर्णपणे जाणीव आहे.

आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की या कठीण आणि आव्हानात्मक परिस्थितीमध्ये आम्ही तुमच्या बरोबर आहोत. या परिस्थितीत आरोग्य, शिक्षण, नोकरी, व्यवसाय, कला, छंद, सामाजिक सुसंवाद या सर्वांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करीत असताना आपले आणि आपल्या कुटुंबाचे आरोग्य आणि शारीरिक स्वास्थ्य याला प्राधान्य येते. हे ध्यानात घेऊनच विषाणूचा धोका कमी होईपर्यंत सर्व आगामी कार्यक्रम तहकूब केले गेले आहेत.

या कठीण परिस्थितीतही आपली कला, संस्कृती आणि वारसा पुढे चालू ठेवणे हे आम्ही आपले आद्य कर्तव्य समजतो. या कठीण काळातही आपल्या उज्ज्वल संस्कृतीचा वारसा पुढे नेण्यासाठी, या कठीण प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी, संगीत-कला-साहित्य यांची आवड जोपासणाऱ्यांना संधी निर्माण करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. ते देखील सर्व सदस्य, रसिक, कलाकार, स्वयंसेवक, प्रायोजक, अशा सर्वांसाठी सुरक्षित असेल अशा वातावरणात.

आम्ही सध्या आमच्या स्थानिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यास असमर्थ असलो तरीही, आमचे एक समविचारी व सहकारी मंडळ, महाराष्ट्र मंडळ बे एरिया (MMBA) यांच्या सहाय्याने "एकपात्री अभिनय स्पर्धा" यावर्षी ऑनलाइन करीत आहोत. काही महिन्यांपूर्वीच पार पडलेल्या चैत्रधून २०२० या संगीत स्पर्धेच्या दैदीप्यमान यशानंतर, महाराष्ट्र मंडळ बे एरिया घेऊन येत आहे "देशव्यापी एकपात्री अभिनय स्पर्धा" आणि तीही अगदी घरबसल्या. या स्पर्धेचे मुख्य ध्येय म्हणजे तुमच्यात दडलेल्या कलाकाराला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे. एकाच वेळी रसिक प्रेक्षक आणि दिग्गज परीक्षकांसमोर तुम्हाला आपली कला सादर करता येणार आहे. आम्हाला खात्री आहे की तुम्ही या सुवर्ण संधीचा नक्कीच फायदा घ्याल.

अधिक माहिती व नोंदणी करण्यासाठी https://mmbayarea.org/ या संकेतस्थळास भेट द्या.